**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३५७/२०१४ निशाणी ३६ वरील आदेश</u>**

०४. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या विरूध्द दिनांक ०१/१२/२०१४ रोजी झालेला एकतर्फा सुनावणी आदेश रद्द करून मिळणेची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे थोडकयात कथन असे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे नोकरी निमित्त बाहेरगावी व प्रतिवादी क्र. ३ अशिक्षीत असल्याने दाव्यासंदर्भात त्यांना माहिती मिळु शकली नाही. करिता त्यांना न्यायालया समोर त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित असल्याने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे देउन केवळ कैफियत दाखल करण्यास उशिर केला आहे, त्यामुळे जास्तीत जास्त दंड करण्यात यावी असे कथन केले आहे.

०६. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा अर्ज, अर्जास म्हणणे, दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकले. वादीने प्रतिवादींच्या विरूध्द दावा वाटपाकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दाव्याचे समन्स मिळुन देखील ते विहित मुदतीत हजर होउ शकले नाहीत अथवा दाव्यास कैफियत दाखल केली नाही. तसेच त्याबाबत कोणतेही संयुक्तिक कारण अर्जामध्ये नमुद केले नाही व त्याबाबत कोणताही संयुक्तिक कागदोपत्री पुरावा अर्जासमवेत दाखल केले नाही. दावा हा वाटपाकरिता असल्याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी देणे प्राप्त परिस्थितीत न्यायोचित ठरते. करिता खालील आदेश पारित करण्यात येते:

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विरूध्द झालेला एकतर्फा सुनावणी आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दंड रूपये ५,०००/— प्रत्येकी सरकार जमा ३ दिवसात करावयाचे आहे अन्यथा सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल.

सही/—

**( मीना प्र. एखे )**
२ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
ता. दौंड, जि. पुणे.

दिनांक: १२/०४/२०१७.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ATNURE M. C. |
| Court | : | Mrs. M.P. Ekhe, JMFC,<br>(Court No.2), Daund. |
| Date | : | 12.04.2017. |
| Judgment signed by the presiding officer on | : | 12.04.2017. |
| Judgment uploaded on | : | 13.04.2017. |